Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www.sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १४५ • Title - Code :- MAHMAR49513 • शनिवार दि.२४ फेब्रुवारी २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# शरद पवारांनी रायगडावरून फुंकली तुतारी

## पालखीतून गाठला गड, 'तुतारी फुंकणारा माणूस' चिन्हाचे केले अनावरण; प्रमुख नेते हजर

**रायगड**–राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी शनिवारी किल्ले रायगडावर तुतारी फुंकणारा माणूस या आपल्या नव्या निवडणूक चिन्हाचे अनावर केले. यावेळी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, माजी मंत्री राजेश टोपे, खासदार अमोल कोल्हे, आमदादार जितेंद्र आव्हाड यांच्यासह सर्वच महत्त्वाचे नेते होते. या कार्यक्रमासाठी शरद पवार स्वतः पालखीतून रायगडावर पोहोचले होते.

यावेळी पवार म्हणाले, ''ही तुतारी एका संघर्षाला सुरुवात करण्यासाठी प्रेरणा देणारी आहे. जनतेसाठी ही आनंदाची तुतारी असेल. राज्याची परिस्थिती बदलण्यासाठी जनतेचे राज्य आणावे लागेल''.सध्याचा संघर्ष हा वैचारिक आहे. या देशात अनेक राजे झाले, संस्थानिक झाले परंतु रयतेचा राजा एकच झाला. सध्या राज्यात अडचणी वाढतील अशी स्थिती आहे. शिवछत्रपतींचे राज्य सामान्यांची सेवा करणारे राज्य होते. आज महाराष्ट्राची स्थिती बदलायची असेल तर पुन्हा एकदा याठिकाणी जनतेचे राज्य येईल यासाठी प्रयत्न करावे लागतील, असे शरद पवार म्हणाले.निवडणूक आयोगाने रणशिंग फुंकायला तुतारी दिली आहे. संघर्षातून प्रेरणा देणारी ही तुतारी आहे. तुमच्या संघर्षातून, त्यागातून यश मिळणार याची खात्री आहे. या ऐतिसाहिक भूमीत आपण आलोय. या



ठिकाणाहून प्रेरणा घेऊन जनतेची सेवा करुया, असेही आवाहन शरद पवारांनी केले.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडल्यानंतर पक्षाचे घड्याळ हे चिन्ह अजित पवार गटाला देण्यात आलं होते. त्यानंतरशरद पवार गटाला निवडणूक आयोगाच्या वतीने तुतारी हे पक्ष चिन्ह मिळाले आहे.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शरद पवार गटाच्या वतीने लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराची सुरुवात म्हणून या कार्यक्रमाकडे पाहिले जात आहे. या माध्यमातून लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराला देखील शरद पवार गट सुरुवात करणार असल्याचे म्हटले जात आहे. या कार्यक्रमाला पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्यासह पक्षातील प्रमुख सर्वच नेते उपस्थित आहेत.दरम्यान, या कार्यक्रमाला जाण्यापूर्वीच सुप्रिया सुळे आणि रोहित पवारांनी आवर्जून कालवा समितीच्या बैठकीला हजेरी लावली होती. या बैठकीला भल्या सकाळी दोघे हजर दिसल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या होत्या.मात्र कालवा समितीची बैठक असल्याचं आणि आमच्या परिसरातील पाणी प्रश्नावर तोडगा काढायला आलो असल्याचं दोघांनी माध्यमांशी बोलताना स्पष्ट केलं. मागील काही दिवसांपासून सुप्रिया सुळे, रोहित पवार आणि अजित पवार यांच्यात कलगीतुरा रंगताना दिसत आहे. त्यानंतर आज तिघांनी एकाच बैठकीत हजेरी लावली आहे.शरद पवार गटाचे खासदार अमोल कोल्हे यांनी तुतारी चिन्हाचा व्हिडिओ ट्विट केला आहे. घड्याळात वेळ झाली तुतारी फुंकण्याची...तुतारी स्वाभिमानाची, शेतकऱ्यांच्या आवाजाची, युवकांच्या ऊर्जेची, महिलांच्या भरारीची, तुतारी राष्ट्रवादीची...! असे अमोल कोल्हे यांनी म्हंटले आहे.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते अजित पवार यांच्या नेतृत्वात पक्षातील अनेक आमदारांनी बंड पुकारात भारतीय जनता पक्षासोबत राज्यातील सत्तेत सहभाग घेतला. यानंतर अजित पवार विरुद्ध शरद पवार अशी लढत निवडणूक आयोग आणि सर्वोच्च न्यायालयात दिसून आली. यानंतर निवडणूक आयोगात झालेल्या सुनवणीत पक्षाचे राष्ट्रवादी काँग्रेस हे नाव आणि घड्याळ हे निवडणूक चिन्ह दोन्ही अजित पवार गटाला देण्याचा निर्णय निवडणूक आयोगाने घेतला. त्यानंतर आता निवडणूक आयोगाने शरद पवार गटाला तुतारी हे निवडणूक चिन्ह दिला आहे. आता तुतारी या नव्या निवडणूक चिन्हाचे लॉन्चिंग रायगडावर होणार आहे. या भव्य लॉचिंग सोहळ्याच्या माध्यमातून लोकसभा निवडणुकीचा रणशिंग फुंकला जाणार असल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे.

# चंद्रपूर जिल्हा भारतीय जनता पार्टी ओबीसी आघाडी ग्रामीण जिल्हा कार्यकारिणी जाहिर

## भारतीय जनता पार्टी ओबीसी आघाडी ग्रामीण जिल्हाध्यक्ष डॉ.अंकुश आगलावे यांनी केली घोषणा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी ओबीसी आघाडी ग्रामीण जिल्हाध्यक्ष डॉ.अंकुश आगलावे यांनी नवनियुक्त चंद्रपूर जिल्हा भारतीय जनता पार्टी ओबीसी आघाडी ग्रामीण कार्यकारिणीची नावे जाहीर केली आहे. यामध्ये सरचिटणीस, उपाध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष यांचा समावेश आहे.

भारतीय जनता पार्टी ओबीसी आघाडी ग्रामीणच्या सरचिटणीसपदी गुरुदास दादाजी पिपरे,प्रवीण सातपुते, कृष्णा काशिनाथ तेजने , मनोज राजेश्वर भूपाल यांची निवड करण्यात आली आहे. भारतीय जनता पार्टी ओबीसी आघाडी ग्रामीणच्या उपाध्यक्षपदी ईश्वर बुधाजी नैताम , दादाजी येरणे, रवी ढवस, धनंजय पिंपळशेंडे ,तुळशीराम कुनघाडकर, किरण बांदूलकर, शेख जुम्मन शेख गुलजार रिझवी, प्रवीण धोडरे, किशोर भरडकर , महेंद्र करकाडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर मनोज रणदिवे हे कोषाध्यक्ष असतील.तसेच एकनाथ गजानन थोटे, संदीप पारखी,निलेश पुलगमकर, रमेश मोहितकर, गुरुदास भेंडाळे, चरणदास गुरनुले, ज्ञानेश्वर भोयर, दिवाकर पुस्तोडे हे सचिव असतील.बंडू बुरांडे , नितीन येल्लुरे ,गणपती मोरे , अनिल मोरे , रुपेश पोडे, संजय कोपरकर , शंकर धनवलकर , अनिल पोडे , पुरुषोत्तम हिंगाने , सुनंदा ढोंगे, उज्वला जयपूरकर , देवा महाजन, सुभाष वाटकर, वसंता बावणे , पाचभाई , धीरज महाकरकार ,अनिल कामडी,वासुदेव लोनबले , वामन टिकले , सचिन गुरूनुले ,सुरज चौधरी, प्रदीप मांडवकर , विनोद सातपुते, प्रशांत ठाकरे, माधव बांगडे, सुभाष नागतोडे, प्रेमलाल धोटे ,नीलकंठ मानापुरे, नरेंद्र दुपारे, संदीप मोरे , रमेश बोरकर, वासुदेव आवारी , पुंडलिक उलमाले , योगेश पोतराजे यांची सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली.भारतीय जनता पार्टी ओबीसी आघाडी चंद्रपूर जिल्हा ग्रामीण कार्यकारणीतील नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे महाराष्ट्राचे वन व सांस्कृतिक कार्य तथा मत्स्य व्यवसाय मंत्री



तथा चंद्रपूरचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार, केंद्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा माजी केंद्रीय गृहराज्य मंत्री हंसराज अहीर, भाजपा जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा , आमदार कीर्तीकुमार भांगडीया ,आमदार रामदास आंबटकर ,भाजपाचे ज्येष्ठ नेते,चंदनसिंह चंदेल , माजी आमदार प्रा. अतुल देशकर , ड.संजय धोटे, माजी जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे, महानगराचे जिल्हाध्यक्ष राहुल पावडे ,विद्या देवाडकर प्रदेश भाजपा चिटणीस , प्रदेश महिला मोर्चा सरचिटणीस अल्का आत्राम,माजी आमदार जैनुद्दीन जव्हेरी , सुदर्शन निमकर , भाजपा नेते अशोक जीवतोडे, जिल्हा महामंत्री डॉक्टर मंगेश गुलवाडे , संध्या गुरूनुले , ब्रिजभूषण पाझारे, राजू गायकवाड, विवेक बोडे, भाजपा ज्येष्ठ नेते विजय राऊत , प्रमोद कडू, खुशाल बोंडे , राजेंद्र गांधी, रमेश राजूरकर , संजय गजपुरे , नामदेव डाहुले , अनिल डोंगरे, आशिष देवतळे, डॉ. अंकुश आगलावे ,अरुण मडावी, महेश देवकाते, वंदना शेंडे, गौतम निमगडे, बंडू गौरकार ,इमरान पठाण आदींनी अभिनंदन केले आहे.

# चिमूर येथे संत तुकाराम महाराज जयंती महोत्सव संपन्न

## संत तुकाराम महाराज सभागृहाचे भूमिपूजन



**चिमूर । प्रतिनिधी**

चिमूर येथे चिमूर तालुक्यातील संपूर्ण कुणबी समाज संघटनेतर्फे नवीन बाजार लोणकर पेट्रोल पंपाच्या मागे संत लप तुकाराम महाराज जयंती महोत्सव साजरा करण्यात आला. याप्रसंगी संत तुकाराम महाराज सभागृहाचा भूमिपूजन सोहळा संपन्न झाला.

या कार्यक्रमा प्रसंगी श्री गुरुदेव सांस्कृतिक सभागृह वडाळा येथून कुणबी समाजाच्या वतीने भजन दिंडीचे आयोजन करण्यात आले. ही भजन दिंडी चिमूर येथील मुख्य मार्गाने संत तुकाराम महाराज सभागृहाच्या जागेपर्यंत नियोजित जागी पोचली. त्यानंतर भूमिपूजनाच्या कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. संत तुकाराम महाराज सभागृहाचे भूमिपूजन चिमूर क्षेत्राचे आमदार कीर्ती कुमार भांगडिया यांच्या हस्ते झाले. या सभागृहाला वैशिष्ट्यपूर्ण विकास योजनेअंतर्गत पाच कोटीचा निधी आमदार भांगडिया यांच्या प्रयत्नाने मंजूर करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गुरुकुंज आश्रम मोझरीचे सरचिटणीस जनार्दन पंत बोथे हे होते.यावेळी महाराष्ट्र शासन लोककला भूषण पुरस्कार प्राप्त भाऊसाहेब थुटे यांचे कीर्तन व प्रबोधनाचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने कुणबी समाजातील नागरिक व महिला उपस्थित होते.

# हिंगणघाट तालुक्यातील टेंभा गावांतील शेकडो कार्यकर्त्यांनी केला भाजपात प्रवेश

## आ.समिर कुणावार यांचे प्रमुख उपस्थितीत स्वीकारला भाजपाचा शेला



**हिंगणघाट । प्रतिनिधी**

हिंगणघाट विधानसभा क्षेत्रात दिवसेंदिवस भाजपाचा मोठया प्रमाणात विस्तार होत असून विधानसभा क्षेत्रातील नागरीक, युवा कार्यकर्ते तसेच महीला आ.समिर कुणावार यांचे नेतृत्वावर विश्वास व्यक्त करीत मोठया प्रमाणात भारतीय जनता पक्षात प्रवेश करीत आहेत.दि. २४ फेब्रुवारी रोजी हिंगणघाट तालुक्यातील टेंभा येथील बहुसंख्य युवा कार्यकर्त्यांनी आ. समीर कुणावार यांचा विधानसभा क्षेत्रातील लोकाभिमुख विकास तसेच कार्यसम्राट आमदार यांची कार्यशैली पहाता मोठ्या संख्येने भाजपात प्रवेश केला.

सदर प्रवेश सोहळ्याचे आयोजन दि. २४ रोजी आ. समीर कुणावार यांच्या स्थानिक जनसंपर्क कार्यालयात करण्यात आले.याप्रसंगी प्रामुख्याने चंद्रकांत हुलके ,हनुमान चंदनखेडे , प्रभाकर हुलके, नरेश थुल, निळकंठ वांढरे, विलास वाघमारे, रणजीत गराड, धनराज कामडी, विनोद वरभे, भास्कर चंदनखेडे, बाबाराव कामडी, वैभव कामडी, सुरज नेहारे ,गजानन हुलके, महादेव बावणे, केशव चांभारे, निलेश कुंमरे , रामभाऊ चाफले, होमराज चाफले, सुनील आत्राम ईत्यादी कार्यकर्त्यांना भाजपात रितसर प्रवेश देण्यात आला. उपरोक्त कार्यक्रम आमदार समीर कुणावार यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.सदर कार्यक्रमाचे वेळी कार्यसम्राट आ.समीर कुणावार यांचेसह भाजपा जिल्हा उपाध्यक्ष किशोरभाऊ दिघे, जिल्हा महामंत्री भाजपा आकाश पोहाणे, हिंगणघाट ग्रामीण भाजपा तालुकाध्यक्ष विनोद विटाळे ,आदिवासी आघाडी जिल्हाध्यक्ष शंकर आश्रम, भाजपा समुद्रपूर तालुका अध्यक्ष वामन चंदनखेडे ,विधानसभा प्रमुख संजय डेहणे, ओबीसी मोर्चा तालुकाध्यक्ष अंकुश कामडी, कृषी उत्पन्न बाजार समिती हिंगणघाटचे संचालक प्रफुल बाडे ,खुशाल चले ,सुमित ढगे इत्यादी भाजपा पदाधिकारी तसेच जेष्ठ कार्यकर्ते उपरोक्त पक्षप्रवेश सोहळ्यास उपस्थित होते.

# चंद्रपूर भाजपा महानगर महिला मोर्चा कार्यकारिणी जाहीर

## भाजपा महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा सविता कांबळे यांनी केली घोषणा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपुर महानगर भाजपा महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा सविता कांबळे यांनी नवनियुक्त चंद्रपूर महानगर भाजपा महिला मोर्चा कार्यकारिणीची नावे जाहीर केली आहे. यामध्ये सरचिटणीस, उपाध्यक्ष, सचिव,यांचा समावेश आहे.

भाजपा चंद्रपूर महानगर महिला मोर्चाच्या महामंत्रीपदी शीला चव्हाण,सुषमा नागोसे कल्पना बगुलकर,याची नियुक्ती करण्यात आली असून उपाध्यक्षपदी चंद्रकला सोयाम,संगीता खांडेकर, जयश्री जुमडे,माया उईके, कविता जाधव, मंजुश्री कासंगोट्टूवार,वंदना तिखे,शितल गुरुनूले,माया मांदाडे,वंदना संतोषवार,कोणीका सरकार, पुष्पा शेंडे, उषा मेश्राम, प्रियंका चिताडे,आशा अबोजवार, सिंधू राजगुरे यांची नियुक्ती करण्यात आली.सचिवपदी वनिता डुकरे, ज्योती गेडाम, शितल आत्राम, पुष्पा उराडे,कविता सरकार, कल्पना गिरडकर, वंदना राधारपवार, स्मिता रेभनकर, वंदना जांभूळकर, सुवर्णा लोखंडे,वर्षा सोमलकर, रेखा चन्ने, सुनिता जयस्वाल,भावना नागोसे,लीलावती रविदास यांच्या नावाची घोषणा चंद्रपुर महानगर भाजपा महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष सविता कांबळे यांनी केली आहे.नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे महाराष्ट्राचे वन व सांस्कृतिक कार्य तथा मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार, केंद्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा माजी केंद्रीय गृहराज्य मंत्री हंसराज अहीर, भाजपा जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा , आमदार कीर्तीकुमार भांगडीया ,आमदार रामदास आंबटकर ,भाजपाचे ज्येष्ठ नेते,चंदनसिंह चंदेल , माजी आमदार प्रा. अतुल देशकर , ड.संजय धोटे, माजी जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे, महानगराचे जिल्हाध्यक्ष राहुल पावडे ,विद्या देवाडकर प्रदेश भाजपा चिटणीस , प्रदेश महिला मोर्चा सरचिटणीस अल्का आत्राम,माजी आमदार जैनुद्दीन जव्हेरी , सुदर्शन निमकर , भाजपा नेते अशोक जीवतोडे, जिल्हा महामंत्री डॉक्टर मंगेश गुलवाडे , संध्या गुरूनुले , ब्रिजभूषण पाझारे, राजू गायकवाड, विवेक बोडे, भाजपा ज्येष्ठ नेते विजय राऊत , प्रमोद कडू, खुशाल बोंडे , राजेंद्र गांधी, रमेश राजूरकर , संजय गजपुरे , नामदेव डाहुले , अनिल डोंगरे, आशिष देवतळे, डॉ. अंकुश आगलावे ,अरुण मडावी, महेश देवकाते, वंदना शेंडे, गौतम निमगडे, बंडू गौरकार ,इमरान पठाण आदींनी अभिनंदन केले आहे.

# इंस्टाग्रामवर झालेल्या मैत्रीतून तरुणाने केला अल्पवयीन मैत्रणीवर अतिप्रसंग

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

उपविभागीय पोलीस विभाग ब्रम्हपुरी अंतर्गत येत असलेल्या तळोधी पोलीस स्टेशन येथे १५ वर्षीय अल्पवयीन पीडित तरुणीने इच्छेविरुद्ध अतिप्रसंग केल्याची तक्रार दाखल केल्यानुसार आरोपी तरुणास पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल झाल्याची घटना शुक्रवारी (दि.२३फेब्रुवारी) रोजी उघडकीस आली.

पीडित अल्पवयीन तरुणीच्या तक्रारीनुसार इन्स्टाग्रामवर एका तरुणाशी ओळख झाली.त्यातुन त्यांची मैत्री होवुन त्याने तिला लग्नाचे आमिष दाखविले.व गुरुवारी ( २२फेब्रुवारी) सिंदेवाही येथील एका लॉजवर नेऊन पीडितेच्या इच्छेविरुद्ध तिच्याशी अती प्रसंग केला.दरम्यान पीडितेच्या फिर्यादीवरून पोलीस स्टेशन तळोधी येथे कलम ३६३,३६६ए ,३७६, ३७६(२)(एन), ३७६(३), ५०६ भादवी सहकलम ४,६ पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असुन आरोपीस ताब्यात घेण्यात आले आहे.गुन्ह्याचा पुढील तपास तळोधी पोलीस स्टेशनचे सपोनि.अजितसिंग देवरे करित आहेत.

सह्याद्रीचा राखणदार




# मेरवान शेरियार इराणी: अवतार मेहरबाबा!

**दि.१० जुलै १९२५पासून आपल्या जीवनातील शेवटच्या श्वासापर्यंत मेहेरबाबांनी मौन धारण केले. आपले अनुयायी आणि अन्य लोक यांच्याशी त्यांनी हातवारे करून तसेच फलकावर शब्दांचा उपयोग करून संवाद साधला. जाती-धर्माचा भेद न बाळगता मेहेरबाबांनी गरीब, मानसिक आजार आणि संसार तापांनी त्रस्त रुग्णांसाठी आश्रम, शाळा व दवाखाने हे विनामूल्य सुरु केले होते. चला तर मग, जयंतीनिमित्त जाणून घेऊया मेहेरबाबा यांच्या जीवनाचे पावन चरित्र श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी यांच्या शब्दांत... संपादक.**

हजरत बाबाजान या आध्यात्मिक महिलेशी भेट झाल्यांनतर मेहेरबाबा यांनी अन्य चार महान सद्गुरुंशी संपर्क साधला. त्यात ताजुद्दीन बाबा, नारायण महाराज, शिर्डीचे साईबाबा आणि उपासना महाराज यांचा समावेश होता. मेहेरबाबा यांच्यानुसार हे पाच गुरुश्रेष्ठ होते, की ज्यांच्यात ईश्वर साक्षात्कार प्राप्त आत्मा होता. त्यांनतर मेहेरबाबांनी कॉस्मोपॉलिटन क्लबची स्थापना केली, जे जगातील धर्मादाय संस्थांना पैसे देण्यास समर्पित होते. मेहेरबाबा हे बहुवाद्य वादक आणि कवी देखील होते. बऱ्याच भाषांमध्ये ते अस्खलितपणे बोलत. त्यांना विशेषतः शेक्सपियर आणि हाफिज यांच्या कविता फार आवडत असत. इ.स.१९२२मध्ये मेहेरबाबा आणि त्यांच्या अनुयायांनी बॉम्बे- आताचे मुंबई येथे मंजिल-ए-मीम-हाऊस ऑफ मास्टरची स्थापना केली. तेथे बाबांनी कठोर शिस्त आणि त्यांच्या शिष्यांना आज्ञाधारकता मागणी करण्याची प्रथा प्रारंभ केली. एका वर्षांनंतर बाबा आणि त्यांची मंडळी अहमदनगर जवळील एका ठिकाणी गेले. ज्याचे नाव त्यांनी मेहेराबाद- आशीर्वादांचा बाग असे ठेवले. सन १९२०च्या दशकात बाबांचे हे आश्रम त्यांच्या कामाचे केंद्र बनले. पुढे मेहेराबादमध्ये त्यांनी शाळा व दवाखाना उघडले. ते त्यांनी सर्व जाती-धर्मांसाठी विनामूल्य खुले केले होते.

अवतार मेहेरबाबा यांचा जन्म दि.२५ फेब्रुवारी १८९४ रोजी महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यात एका झोरास्ट्रियन कुटुंबात झाला. मेहेरबाबा यांचे मूळ नाव मेरवान शेरियार इराणी असे होते. सुरुवातीच्या काळात त्यांची आई व वडील इराणमध्ये राहायचे, नंतर ते भारतात स्थलांतरित झाले. त्यांचे वडील हे परमेश्वराचे अस्सल साधक होते. अध्यात्म श्रेणीरचनाद्वारे त्यांना सांगण्यात आले होते, की साक्षात्कार होऊन देव त्यांच्या पुत्ररूपात त्यांच्याकडे येईल. यासोबतच जन्म झाला तो म्हणजे एका महान अध्यात्मिक गुरु अवतार मेहेरबाबांचा.



जन्मानंतर मेहेरबाबांनी आपले शालेय शिक्षण ख्रिश्चन हायस्कूलमध्ये केले असून डेक्कन कॉलेज मधून उच्च शिक्षण प्राप्त केले होते. डेक्कन कॉलेजमध्ये शिक्षण घेत असतांना मेहेरबाबा यांची भेट हजरत बाबाजान म्हणजे एका अफगाणिस्थानी वृद्ध महिलेशी झाली. जी पुण्यातील एका रोडवर असलेल्या निंबाच्या झाडाखाली रहायची. त्याकाळात हजरत बाबाजान यांची अध्यात्मिक गुरु म्हणून प्रसिद्धी होती. मेहेरबाबा यांच्यानुसार हजरत बाबाजान या ईश्वर साक्षात्कार प्राप्त आत्मा होत्या. त्या पाच महान सद्गुरुंपैकी एक होत्या. हजरत बाबाजान यांनी मेहेरबाबा यांच्या कपाळाचे चुंबन घेऊन त्यांच्या मनात आध्यात्मिक प्रवृत्ती जागृत केली होती.

मेरवान शेरियार इराणी अर्थातच अवतार मेहेरबाबा हे भारतातील गूढवादी, धार्मिक आणि अध्यात्मिक गुरु होते. वयाच्या ६०व्या वर्षी त्यांनी घोषित केले, की ते या युगातील 'अवतार' आहेत. अवतार म्हणजेच स्वर्गात राहत असणारे देव पृथ्वीवर मनुष्याचा जन्म घेतात. दि.१० जुलै १९२५पासून आपल्या जीवनातील शेवटच्या श्वासापर्यंत मेहेरबाबांनी मौन धारण केले. आपले अनुयायी आणि अन्य लोक यांच्याशी त्यांनी हातवारे करून तसेच फलकावर शब्दांचा उपयोग करून संवाद साधला. जाती-धर्माचा भेद न बाळगता मेहेरबाबांनी गरीब, मानसिक आजार आणि संसार तापांनी त्रस्त रुग्णांसाठी आश्रम, शाळा व दवाखाने हे विनामूल्य सुरु केले होते. जुलै १९२५मध्ये धारण केलेल्या मौनी वृत्तीप्रमाणे मेहेरबाबा हे आपल्या जीवनातील शेवटच्या क्षणापर्यंत शांत राहिले. दि.३१ जानेवारी १९६९ रोजी या महान गूढवादी आणि अध्यात्मिक गुरुचे निधन झाले.

!! पावन जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन !!

संकलन व सुलेखन –
श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरुजी.
मु. पो. ता. जि. गडचिरोली
फक्त व्हॉ. नं. ९४२३७१४८८३

## वसंत विधाते यांची काँग्रेसच्या चंद्रपूर जिल्हा महासचिव पदी निवड



**वरोरा**–वरोरा तालुक्यातील सहकार क्षेत्रात मोठ्या आदराने घेतल्या जाणारे नाव म्हणजे वसंतराव विधाते .यांची चंद्रपूर जिल्हा काँग्रेस कमेटीच्या महासचिव पदी निवड करण्यात आली आहे.वसंतराव विधाते हे जिल्हा सहकार बोर्डाचे विद्यमान उपाध्यक्ष असून चंद्रपूर जिल्हा सहकारी बँकेचे ते माजी संचालक आहे. विद्यार्थी दशे पासून त्यांनी काँग्रेस च्या विविध पदावर काम बघितले आहे. वरोरा भद्रावती दोन्ही तालुक्यात त्यांच्या शिक्षण संस्था असून सामाजिक कार्यात नेहमीच ते अग्रेसर असतात हे विशेष. त्यांच्या या निवडीमुळे सर्व स्तरावरून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे .

## राज्यात १३ हजार अंगणवाड्यांमध्ये मदतनीस पदांची भरती

**सोलापूर :** अंगणवाडीतील मदतनीस पदासाठी अकलूज व माळशिरस येथील दोन उमेदवारांनी थेट राज्याच्या मुख्यमंत्र्यांचेच शिफारस पत्र आणले आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदेतील महिला व बालकल्याण विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकाऱ्यांनी भरतीचे नियम व अटीच्या अधीन राहून त्या दोन्ही अर्जांचा प्राधान्याने विचार करावा, असे पत्र तालुक्याच्या प्रकल्प कार्यालयास पाठविले आहे.राज्यात बेरोजगारी प्रचंड प्रमाणात वाढली असून ७५ हजार पदांच्या शासकीय मेगाभरतीतील अनेक परीक्षा झालेल्या नाहीत. तलाठ्यांसह अनेक परीक्षांचे निकाल प्रलंबित असून आरक्षणातील बदलामुळे नव्याने होणारी पदभरती थांबली आहे. त्यामुळे अनेकजण किरकोळ नोकरीसाठी देखील मुख्यमंत्र्यांसह इतर मंत्र्यांचे शिफारस पत्र आणत आहेत. दरम्यान, गावातच आपल्या कुटुंबातील महिलेला नोकरी मिळावी म्हणून अकलूज व माळशिरस येथील दोन उमेदवारांनी मुख्यमंत्र्यांचेच शिफारस पत्र आणले. ते शिफारस पत्र जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाकडे आले. त्यानंतर महिला व बालकल्याण विभागाने यापूर्वी त्या दोन्ही ठिकाणी मदतनीस पद रिक्त नसल्याचे संबंधितांना कळविले. पण, आता मदतनीस पदांची भरती सुरू झाल्याने मुख्यमंत्र्यांच्या शिफारस पत्रानुसार त्या दोन्ही अर्जांचा प्राधान्याने विचार करावा, असे तालुक्याच्या प्रकल्प अधिकाऱ्यांना कळविण्यात आले आहे.सोलापूर जिल्ह्यातील ९०१ मिनी अंगणवाड्यांसह राज्यभरातील १३ हजार सात मिनी अंगणवाड्या आता मोठ्या होणार आहेत. त्यामुळे या सर्वच अंगणवाड्यांमध्ये आता नव्याने मदतनीस पदे भरण्याची कार्यवाही सुरू झाली आहे. गावागावांतील इयत्ता बारावी उत्तीर्ण १३ हजार तरुणींसह महिलांना त्याठिकाणी नोकरीची संधी मिळणार आहे. तालुका स्तरावरील प्रकल्प कार्यालयात अर्ज भरण्याची कार्यवाही सुरू झाली आहे.

## राज्यातील सर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांना बी.एल.ओ.च्या कामातून वगळण्यात यावे

### महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक शिक्षक संघटनेची मागणी

**मूल । प्रतिनिधी**

नुकतेच मुंबई व उपनगर भागातील शिक्षकांना बिएलओ च्या अशैक्षणिक कामातून मुक्त करण्याचे आदेश दिलेले आहेत त्याचप्रमाणे राज्यातील सर्व जिल्ह्यातील शिक्षकांना सुद्धा या कामातून मुक्त करावे अशी मागणी महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक शिक्षक संघटनेच्या वतीने प्रसाद पाटील राज्याध्यक्ष, हरीश ससनकर राज्य सरचिटणीस यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांना निवेदनाद्वारे केली आहे.

मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य यांनी २२ फेब्रुवारी च्या पत्रानुसार शिक्षक व विद्यार्थ्यांची बाजू समजून घेतली याबद्दल महाराष्ट्र निवडणूक आयोगाचे संघटनेच्या वतीने आभार व्यक्त करण्यात येत आहे.बी एल ओ च्या कामामुळे राज्यभरातील शिक्षक विद्यार्थी व पालक त्रस्त आहेत,विद्यार्थ्यांना शिकवण्याचा बराचसा वेळ यामध्ये वाया जात आहे. ज्याप्रमाणे मुंबई व उपनगर भागातील शिक्षकांना या कामातून वगळून दिलासा दिला आहे त्याचप्रमाणे राज्यातील सर्व जिल्ह्यातील शिक्षकांना सुद्धा दिलासा द्यावा व बी एल ओ हँडबुक मध्ये नमूद अन्य बारा संवर्गातील कर्मचारी व नव्याने ॲड केलेले सेवानिवृत्त कर्मचारी यांना बी एल ओ चे काम देण्यात यावे.अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. निवेदनावर राज्य नेते विजय भोगेकर, राज्याध्यक्ष प्रसाद पाटील, राज्य सरचिटणीस हरिश ससनकर, राज्य कार्याध्यक्ष प्रकाश पाध्ये, राज्य कोषाध्यक्ष बालाजी पांडागळे, महिला राज्याध्यक्ष डॉ.अल्का ठाकरे, सचिव शारदा वाडकर, राज्य संघटक भुपेश वाघ,राज्य उपाध्यक्ष जी.एस.मंगनाळे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.असे जिल्हाध्यक्ष किशोर आनंदवार,जिल्हा सरचिटणीस सुरेश गिलोरकर,जिल्हा कार्याध्यक्ष गंगाधर बोढे,जिल्हा कोषाध्यक्ष सुनिल कोहपरे यांनी माहिती दिलेली आहे असे जिल्हा प्रसिद्धीप्रमुख लक्ष्मण खोब्रागडे यांनी कळविले आहे.

## सोलापुरातील २.१३ लाख ग्राहक 'महावितरण'च्या रडारवर

**सोलापूर :** पश्चिम महाराष्ट्रातील घरगुती, वाणिज्यिक व औद्योगिक वर्गवारीतील १४ लाख आठ हजार वीज ग्राहकांकडे २५३ कोटी ३१ लाख रुपयांची थकबाकी आहे. त्यात सोलापूर जिल्ह्यातील दोन लाख १२ हजारांहून अधिक ग्राहकांकडे देखील थकबाकी आहे. उन्हाळ्यामुळे विजेची मागणी वाढत असल्याने महावितरणने थकबाकीदारांवर कनेक्शन तोडण्याची कारवाई सुरू केली आहे.चालू व थकीत वीजबिलांचा भरणा करणे सोयीचे व्हावे, यासाठी पुणे, कोल्हापूर, सांगली, सातारा व सोलापूर जिल्ह्यातील महावितरणचे अधिकृत वीजबिल भरणा केंद्र शनिवारी व रविवारी सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी कार्यालयीन वेळेत देखील सुरू ठेवण्यात येणार आहेत. सोलापूर जिल्ह्यातील दोन लाख १२ हजार ९६० ग्राहकांकडे ३६ कोटी पाच लाख रुपयांची थकबाकी आहे.



वीजबिलांचा नियमित भरणा होत नसल्याने महावितरणची आर्थिक स्थिती गंभीर झाली आहे. त्यामुळे वीजग्राहकांनी चालू व थकीत बिलांचा भरणा करून सहकार्य करावे, असे आवाहन पुणे प्रादेशिक संचालक अंकुश नाळे यांनी केले आहे. सध्या सुरू असलेल्या महावितरणच्या धडक मोहिमेमध्ये वीजपुरवठा खंडित केलेल्या थकबाकीदारांच्या वीजजोडण्याची स्वतंत्र पथकाद्वारे तपासणी सुरू आहे. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर विजेची मागणी वाढत असून महावितरणने थकबाकीदारांवर कारवाई करण्याची मोहीम हाती घेतली आहे.

## बॅलेट पेपरवर मतदान! ८० वर्षांवरील वृद्ध अन दिव्यांग मतदारांसाठी सोय

**सोलापूर :** लोकसभा निवडणुकीसाठी ८० वर्षांवरील ज्येष्ठांसह किमान ४० टक्के दिव्यांग असलेल्या मतदारांना मतदानासाठी केंद्रापर्यंत येता येत नसल्यास त्यांना घरी बसूनच मतदान करता येणार आहे. पंढरपूर विधानसभेच्या पोटनिवडणुकीवेळी असा प्रयोग झाला होता. आता लोकसभेतही 'होम वोटिंग'ची सोय असणार आहे, पण तो मतदारांचा ऐच्छिक अधिकार आहे. सोलापूर जिल्ह्यात ८० वर्षांवरील व दिव्यांग मतदारांची संख्या एक लाख ३४ हजारांपर्यंत आहे. 'बीएलओ'कडे तसा अर्ज दिलेल्यांनाच घरबसल्या मतदान करता येणार आहे.सोलापूर जिल्ह्यातील मतदारांची संख्या ३५ लाख ७८ हजार ९७२ असून, त्यापैकी एक लाख नऊ हजार १६२ जणांचे वय ८० वर्षांहून अधिक आहे. तर २४ हजार ८६० दिव्यांग मतदार आहेत.




मतदानाची टक्केवारी वाढावी, यासाठी कमी मतदान पडलेल्या गावचे प्रश्न जिल्हा प्रशासनाकडून सोडविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. देशातील मतदानाची टक्केवारी सरासरी ६७ ते ६८ टक्क्यांपर्यंत आहे. पण, सोलापूर जिल्ह्यात मागील लोकसभा निवडणुकीत ६१ टक्केच मतदान झाले होते. लोकशाहीच्या उत्सवात सर्वांनीच सहभागी व्हावे म्हणून ज्येष्ठांसह दिव्यांग मतदारांसाठी 'होम वोटिंग' सोय करून देण्यात आली आहे.निवडणुकीच्या काही दिवस अगोदर 'बीएलओ' त्या मतदारांपर्यंत पोचतील आणि त्यांच्याकडून घरी राहून की मतदान केंद्रावर येऊन मतदान करणार, याचा अर्ज भरून घेतील. ज्यांनी 'घरी बसून' असा पर्याय निवडला आहे, त्यांची तालुका तथा मतदान केंद्रनिहाय यादी तयार केली जाईल. त्यानंतर मतदानाच्या एक-दोन दिवस अगोदर संबंधित मतदारांकडून बॅलेट पेपरवर त्यांचे मत नोंदवून घेतले जाणार आहे.

### माझे वडील गोपीनाथराव मुंडे हे या संस्थानचे निस्सीम भक्त होते

# संत मिराबाई (आईसाहेब) यांची भक्ती व महंत राधाताई यांचे प्रेम या मुळेच माझी संस्थानवर श्रध्दा-पंकजाताई मुंडे

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील महासांगवी येथील श्री क्षेत्र संत मिराबाई(आईसाहेब) संस्थान या ठिकाणी सिध्द संत मिराबाई(आईसाहेब)यांच्या २६ व्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताह व भागवत कथा ज्ञान यज्ञ सोहळ्याची दिनांक २२ फेब्रुवारी-२०२४ गुरुवार रोजी संस्थानच्या मठाधिपती महंत राधाताई महाराज(आईसाहेब) यांच्या काल्याच्या किर्तनाने सांगता झाली. या प्रसंगी भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे सह आजी, माजी आमदार व इतर मान्यवरांची उपस्थिती होती. या वेळी बोलताना माजी मंत्री पंकजाताई मुंडे म्हणाल्या की माझे वडील गोपीनाथराव मुंडे हे या संस्थानचे निस्सीम भक्त होते. त्यांच्या बरोबर मी येथे येत असे त्यांनीच मला या गडाचा विसर पडु देऊ नको असे सांगितले होते. त्या मुळेच माझी मिराबाई आईसाहेबावर भक्ती होती, आणि त्यांच्या नंतर राधाताई महाराज यांचे असणारे प्रेम या मुळे मला श्री क्षेत्र संत मिराबाई(आईसाहेब) संस्थानचा विसर पडत नाही. या वेळी विधान परिषद सदस्य आमदार सुरेश आण्णा धस, आष्टी/पाटोदा/शिरूर मतदार संघाचे आमदार बाळासाहेब आजबे(काका), माजी




आमदार भिमराव धोंडे, महानंद दुध संघ मुंबई चे उपाध्यक्ष सहकार महर्षी रामकृष्ण बांगर यांच्या सह आदीची व्यासपीठावर उपस्थिती होती. गेल्या वर्षी पासुन महंत राधाताई महाराज यांनी संस्थानच्या वतीने प्रतिवर्षी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना कर्मयोगीणी पुरस्कार देण्याची परंपरा सुरु केली असुन गेल्या वर्षी हा पुरस्कार माजी मंत्री तथा भाजपाच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांना प्रदान करण्यात आला होता. तर या वर्षी हा पुरस्कार प्रशासन सेवेतील आयुक्त सुजाताताई ढोले-खाडे यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या वेळी महंत राधाताई महाराज (आईसाहेब)बोलताना म्हणाल्या की महाराष्ट्राला संतांची परंपरा असुन वारकरी सांप्रदायाच्या विचाराने, आचाराने, संस्काराने चालणारा महाराष्ट्र आहे. ज्ञानोबा महाराज, तुकाराम महाराज, संत जनाबाई, संत मुक्ताबाई संत भगवान बाबा, संत वामनभाऊ, यांच्या सह संत मिराबाई(आईसाहेब)होऊन गेल्या. सन-१९६१ साली श्री संत भगवान बाबाच्या उपस्थीतीत या संस्थानची स्थापना झाली, त्यांनी या संस्थानवर माहिलेला स्थान दिले. त्या मुळे संत भगवान बाबांनीच आध्यात्मिक क्षेत्रात महिलांना प्रथम आरक्षण दिले असल्याचे प्रतिपादन महंत राधाताई महाराज यांनी केले.

महासांगवी व कवडवाडी ग्रामस्थांची या संस्थानवर श्रद्धा असल्यामुळेच व त्यांचेच सहकार्य असल्यामुळे दरवर्षी येथे मोठा अखंड हरिनाम सप्ताह होतो. संस्थानच्या विकासात सर्वच आजी, माजी आमदार, आजी, आजी खासदार, आजी, माजी मंत्री तसेच सर्वच क्षेत्रातील नागरीकांच्या सहकार्यामुळेच संस्थानचा विकास झाला असल्याचे या वेळी त्यांनी सांगितले. या वेळी मा. जि.प.अध्यक्षा सविताताई गोल्हार, मा.जि.प.अध्यक्ष सय्यद अब्दुल्ला(आबुशेठ), प्रताप(काका)ढाकणे, चंपावतीकाकी पानसंबळ, सुभा[illegible]रसागर, नगराध्यक्ष राजु(भैय्या)जाधव, अनिल शेठ बडगावकर, बरके दादा, जगताराम पालवे, पोपट बडे, रा.कॉ.तालुकाध्यक्ष दिपक (दादा)घुमरे, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष संजय सानप, अँड. सुधीर घुमरे, मधुकर गर्जे, मा.जि.प.सभापती महेंद्र गर्जे, देविदास शेंडगे, अनुरथ दादा सानप, महासांगवी सरपंच चैत्राली नामदेव सानप, नगरसेवक महादेव जाधव, नगरसेवक ड.सुशील कोठेकर, सभापती श्रीहरी गिते पाटील, पत्रकार महेश बेदरे, स्वामी सानप, शिवाजी गर्जे, सद्गुरु गर्जे, सुधाकर गर्जे, किसन देवा सानप, यांच्या सह आजी, माजी नगरसेवक, इतर आजी, माजी,पदाधिकारी, पत्रकार, तसेच महासांगवी, कवडवाडी येथील ग्रामस्थांसह मोठ्या संख्येने भाविक भक्त उपस्थित होते. या वेळी उपस्थित मान्यवरांचे आभार संस्थानच्या वतीने मा.जि.प.सभापती महेंद्र गर्जे यांनी मानले. या प्रसंगी माजी मंत्री पंकजाताई मुंडे यांचे अभुतपुर्व स्वागत करण्यात आले.पंकजाताई यांचे संस्थानवर आगमन होताच जि.प.प्राथमिक शाळेतील मुलीनी त्यांच्या वर फुलांचा वर्षाव केला, तर महासांगवी व कवडवाडी येथील महिलांनी भगिनींनी औक्षण केले.

# डॉ.मोहन भागवत यांची माहूरची उपशक्ती पीठ श्री मंगला माता देवस्थानला ऐतिहासिक भेट

## विवेकामुळे संकटावर मात करून हनुमंताचा विजय -सरसंघचालक





**वर्धा । अविनाश भोपे**

मनुष्यामध्ये सत्व, राजस आणि तामस असे तीन गुण असतात. आसुरी शक्तीचा नेहमी अंतच होत असतो. आपण ज्यावेळी उपासना करतो त्यावेळी निश्चितच आपले सद्गुण वाढत असतात, शक्ती वाढत असते. श्रीराम हे सर्व सद्गुणांचे प्रतीक आहेत. तमो गुण नष्ट करून सत्वगुण अंगीकारल्यास सर्व क्षेत्रात यश प्राप्त होते. तसेच कोणत्याही प्रकारचे युद्ध असो ते करताना शुद्ध चरित्र असणे आवश्यक असते. श्रीरामांच्या व हनुमंताच्या अशा शुद्ध चरित्रामुळेच ते जिंकले आणि तमो गुणामुळे रावण हरला. संघाचे द्वितीय सरसंघचालक गोळवलकर गुरुजी यांनी सुद्धा सत्कार्यात आपले जीवन व्यतीत केले. म्हणून आज आपल्याला हा संकल्प पहावयास आणि प्रत्यक्ष करावयास मिळतो आहे,असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी येथे केले.

डॉ. मोहन भागवत यांनी रविवार दि.२४ फेब्रुवारी ला धामणगाव तालुक्यातील मंगरूळ दत्त येथील माहूरची उपशक्ती पीठ श्री.मंगला माता देवस्थानला भेट दिली. ही भेट ऐतिहासिक ठरली. क्षण होता संघाचे द्वितीय सरसंघचालक गोळवळकर गुरुजी यांच्या या मंदिरातील भेटीला ८१ वर्ष पूर्ण झाल्याचा. गोळवळकर गुरुजींनी ज्यावेळी या मंदिराला भेट दिली होती, त्यावेळी एका छोट्याशा झोपडीमध्ये हे मंदिर होते. या मंदिराला आता भव्य दिव्य रूप प्राप्त झाले आहे.

पुढे बोलताना सरसंघचालक म्हणाले, शील असल्याशिवाय शक्ती येत नाही आणि शक्तीशिवाय संकल्प होत नाही. जिथे शील आहे, तिथे संकल्प पूर्ण होतोच आणि विवेक असला की सर्व गोष्टी सरळ होतात. तसेच जिथे अहंकार येतो तिथे कोणत्याच गोष्टी शक्य होत नाही. रावण महापराक्रमी होता, महाबलवान होता, सर्व गुणांनी संपन्न होता. परंतु रावणाच्या अंगात अहंकार आल्यामुळे त्याला पराजय स्वीकारावा लागला तर दुसरीकडे सर्व

### तमो गुणामुळे रावणाचा पराभव झाला

शक्तिमान श्री हनुमान हे सदैव विवेकपूर्ण आणि अहंकार मुक्त असल्यामुळे त्यांनी रावणाला मात दिली.संकटावर विजय मिळवला

या मंगलमय प्रसंगी सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांच्या हस्ते मंगला मातेची आरती करण्यात आली. मंगरूळ दत्त येथील श्री मंगला माता मंदिरात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे द्वितीय सरसंघचालक परमपूज्य श्री माधव सदाशिवराव गोवळकर गुरुजी यांचे १९४२ ला आगमन झाले होते. या साक्षात्काराच्या ८१ व्या वर्ष पूर्ती निमित्य मंगरूळ येथे मंगला माता मंदिराद्वारे १०० साधकांच्या माध्यमाने श्री गुरुचरित्र पारायण सोहळा, घोरकष्टोद्धरण स्त्रोताचे एक हजार पाठ अनुष्ठान, मंगरूळ येथील पुरोहितांद्वारे श्री दुर्गा सप्तशतीचे ११०० पाठ आणि ५००० भक्तांद्वारे घरोघरी श्री हनुमान चालीसा उपासना अभियान इत्यादी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात होते. या अभियानाचा समारोप सोहळा सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. कार्यक्रमांची सुरवात दिप प्रज्वलन व श्री. मंगला माता, श्री गुरुजी व श्री. हनुमंताच्या प्रतिमांचे करून झाली.याप्रसंगी मंचावर जिल्हा संघचालक विपीन काकडे, मंगला माता देवस्थान संस्थेचे अध्यक्ष प्रभाकर खानझोडे व सचिव रविंद्र देशपांडे उपस्थित होते .प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष प्रभाकर खानझोडे यांनी केले. त्यांनी मंदिरासह मंगरूळचा इतिहास विशद केला. मंगरूळसारख्या छोट्याशा गावातून संघाकरिता ४ प्रचारक निघाल्याचा विशेष उल्लेख त्यांनी केला. मंगला माता मंदिराच्या विकासामध्ये संघाच्या अनेक कार्यकर्त्यांचे योगदान असल्याचे त्यांनी सांगितले. मंदिराचे मुख्य पुजारी मोहन देव यांनी यावेळी संकल्पाचे वाचन केले. आपल्या अभिप्रायामध्ये सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी संकल्पांचा विशेष उल्लेख केला.मंगला माता मंदिर ट्रस्टचे दिवाकर देशपांडे, प्रशांत शेटे, राजेंद्र सोनी, मोहन महाराज देव, जुगल किशोर मुंदडा, शरदचंद्र देशपांडे, प्रदीप फडणवीस आदींनी याप्रसंगी डॉ. मोहनजी भागवत यांची भेट घेतली आणि संस्थेच्या प्रारूपाची त्यांना माहिती दिली. कार्यक्रमाला मंगरूळ तथा परिसरातील महिला-पुरुषांची लक्षणीय उपस्थिती होती. अनेक संत, महंत सुद्धा यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन वैभव पोतदार यांनी केले तर आभार सचिव रवींद्र देशपांडे यांनी व्यक्त केले.कार्यक्रमाला प्रांत सहसंघचालक श्रीधरराव गाडगे, प्रांत कार्यवाह अतुल मोघे, माजी विभाग संघचालक चंद्रशेखर राठी, प्रांत शारीरिक प्रमुख प्रशांत दाणी, खा. अनिल बोंडे,आ. प्रताप अडसड प्रामुख्याने उपस्थित होते.

## मूल येथे विश्वकर्मा जयंती संपन्न



**मूल । प्रतिनिधी**

विश्वकर्मा पांचाळ समाज बहुउद्देशीय संस्था मुल द्वारे जयंती महोत्सव आयोजित करण्यात आली.भगवान विश्वकर्मा यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.या कार्यक्रमाचे अध्यक्ष वसंतराव जिरकुंटवार,प्रमुख अतिथी निलेश राय उद्योजक तथा सामाजिक कार्यकर्ता,गंगाधरराव यलचलवार, मधुकरराव शेंडे,संजय येरोजवार,रमेशराव पुल्लजवार,मनोहरराव राजुरवार विजयराव वैरागडवार,रमेशराव चोप्पावार,अल्का राजमलवार उपस्थीत होते.

या कार्यक्रमात ज्येष्ठ नागरिक यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.समाजाला भरभरून मदत केला बदल भास्करराव कत्रोजवार,सुमन कत्रोजवार,संदीप बदेलवार,रंजना बदेलवार यांचे शाल श्रीफळ व साळी चोळी देऊन सत्कार करण्यात आला,तसेच पांचाळ समाजाच्या वतीने सचिव विजय वैरागडवार यांनी आभार मानले,या कार्यक्रमात १० वी १२ वी गुणवंत विद्यार्थी सत्कार, गितगायन स्पर्धा,नुत्य स्पर्धा,रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली.या मध्ये प्रथम,द्वितीय तृतीय क्रमांक येणाऱ्या स्पर्धकांना सत्कार करुन प्रोत्साहनपर बक्षीस देण्यात आले.या कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी बाबुराव गनलावार,विद्याधर मेडपल्लीवार, दिलीप कटलावार,विनायक कत्रोजवार,दत्तात्रय चिटलोजवार, एकनाथ गुंडोजवार,राजेंद्र मेडपल्लीवार,संजय बदेलवार यांनी पुढाकार घेतला होता.कार्यक्रमाचे संचालन विलास यलचलवार,नंदा तासलवार,व आभार प्रदर्शन विक्की बोदगुलवार यांनी केले.यावेळी विश्वबाम्हण पांचाळ समाज बहु संख्येने उपस्थित होते.

## राजर्षी शाहू कॉन्व्हेंट मध्ये स्नेहसंमेलन संपन्न




**वरोरा । प्रतिनिधी**

आजची बालके ही उद्याची राष्ट्राची संपत्ती आहे. त्यांच्यावर सुसंस्कार करणे हे शालेय शिक्षण संस्थांचे कर्तव्य आहे.बालकांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी आम्ही सतत कार्यरत आहोत.बालके लहानपणी खोडकर मस्तीखोरं असतात. उद्याचे ते शास्त्रज्ञ ,सुज्ञ नागरिक आहेत.त्यांचे व्यक्तिमत्त्व घडवण्यासाठी आमचे कॉन्व्हेंट सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे.आपली संस्कृती टिकवण्यासाठी आपण सगळे प्रयत्नशिल असले पाहिजे विचार प्राचार्य सुनंदा पिदूरकर (उमरे) यांनी व्यक्त केले. मुक्ताई बहुउद्देशीय शिक्षण संस्था वरोरा द्वारा संचालित राजर्षी शाहू कॉन्व्हेंटमध्ये आयोजित स्नेहसंमेलनात कार्यकमाच्या अध्यक्षस्थानाहून त्या बोलत होत्या. यावेळी उद्घाटक म्हणून मुक्ताई बहुउद्देशीय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष विलास पिदूरकर, प्रमुख पाहुणे म्हणून बोर्डा ग्रामपंचायतचे सरपंच राहुल ठेंगणे, संदीप आंबेडकर, डॉ. मंगेश उमरे, डॉ. धनश्री उमरे, मार्गदर्शक म्हणून मंचावर उपस्थित होते. यावेळी नृत्य स्पर्धा, फॅन्सी ड्रेस स्पर्धांसह विविध स्पर्धा पार पडल्या. कार्यक्रमाचे संचालन साक्षी कुमरे, आभार विद्या झाडे यांनी मानले.यावेळी मोठ्या प्रमाणात पालक व नागरिक उपस्थित होते.

## मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी मैदानी खेळ आवश्यक-छोटूभाऊ शेख

### छ.संभाजी महाराज क्रिकेट क्लब जामगाव (बु ) तर्फे क्रिकेट सामन्यांचे आयोजन



**वरोरा । प्रतिनिधी**

मैदानी खेळ हे त्यांना शारीरिक व्यायाम करण्यास प्रोत्साहित करते, जे लठ्ठपणा टाळण्यासाठी आणि शरीर निरोगी राखण्यासाठी आवश्यक आहे.मैदानी खेळ खेळल्यामुळे शारीरिक तसेच मानसिक थकवा निघून जाण्यास मदत होते.त्यामुळे अशा क्रीडा स्पर्धांचे आयोजन व्हायला पाहिजे.असे प्रतिपादन छत्रपती संभाजी महाराज क्रिकेट क्लब जामगाव (बु ) तर्फे आयोजित तालुका स्तरीय क्रिकेट सामन्याच्या उदघाटन प्रसंगी आपल्या उदघाटणीय भाषणात माजी सभापती तथा माजी नगरसेवक नगरपरिषद वरोरा शेख जैरुद्दीन उर्फ छोटूभाऊ यांनी केले . वरोरा तालुक्यातील जामगाव (बु) येथे छत्रपती संभाजी महाराज क्रिक्रेट क्लब तर्फे तीन दिवसीय तालुका स्तरीय क्रिकेट सामन्यांचे आयोजन करण्यात आले . या सामन्याचे शनिवार दिनांक २४ फेब्रुवारीला उदघाटन करण्यात आले या कार्यक्रमाला उदघाटक म्हणून वरोरा नगरपरिषदेचे माजी सभापती तथा माजी नगरसेवकशेख जैरुद्दीन उर्फ छोटूभाऊ ,अध्यक्ष म्हणून जामगाव चे सरपंच गुणवंत ठेंगणे,प्रमुख अतिथी म्हणून माजी जिल्हा परिषद सदस्या ज्योती वाकडे,उपसरपंच मनीषा आसुटकर,पत्रकार आशिष घुमे,तंटामुक्ती अध्यक्ष श्रीकृष्ण घाडसे,दीपक तुराणकर,प्रशांत ताजने प्रवीण कळसकर शेषराव भोयर आदी मान्यवर उपस्थित होते .या वेळी राजमाता जिजाऊ,छत्रपती शिवाजी महाराज यांच्या फोटोला माल्यार्पण करून कार्यक्रमाला सुरवात करण्यात आली.या नंतर फित कापून व पूजन करून उदघाटन करण्यात आले. तसेच गावो गाव फिरून स्वच्छतेचा मंत्र देणारे व जनजागृती करणारे खराटे महाराज नावाने प्रसिद्ध उद्धव बारतिने यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला . या कार्यक्रमाचे संचालन व आभार श्रीकांत चिडे यांनी केले . यावेळी गावातील नागरिक,खेळाडू उपस्थित होते

# जिल्ह्यातील उद्योगांना चालना व उद्योग वाढीसाठी ॲडवांटेज चंद्रपूर इंडस्ट्रियल एक्सपो अँड बिजनेस कॉन्क्लेव्हचे आयोजन

## पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून नाविन्यपूर्ण उपक्रमाचे आयोजन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जिल्हा प्रशासन, एम.एस.एम.ई., एमआयडीसी व एमआयडीसी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने, दि. ४ व ५ मार्च २०२४ रोजी ॲडवांटेज चंद्रपूर इंडस्ट्रियल एक्सपो अँड बिजनेस कॉन्क्लेव्हचे आयोजन वन अकादमी येथे करण्यात येत आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या संकल्पनेतून हा नाविन्यपूर्ण उपक्रम जिल्ह्यात राबविण्यात येत आहे.

या कार्यक्रमाकरीता केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्री नारायण राणे, राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत याशिवाय उद्योग क्षेत्रातील नामांकित कुमार मंगलम बिर्ला तसेच अदानी ग्रुपचे पार्थ अदानी यांना सदर कार्यक्रमाकरीता आमंत्रित करण्यात आले आहे. या इंडस्ट्रियल एक्सपो च्या माध्यमातून नवउद्योजकांना प्रेरित करणे, जिल्ह्यातील उद्योगधंद्यांची माहिती विविध घटकांपर्यंत पोहोचविणे तसेच प्रस्थापित उद्योगांना जिल्ह्यातील उद्योगपूरक वातावरणाची माहिती देऊन उद्योगवाढीस प्रेरणा देणे, जिल्ह्यामध्ये विविध उद्योगाबरोबरच सामंजस्य करार(एमओयु) करणे याबाबत नियोजन असून चंद्रपूर जिल्ह्याची निगडित खनिज उद्योग, स्टील उद्योग, सिमेंट, स्टार्टअप, एफ.आय.डी.सी. ॲग्रो बेस इंडस्ट्रीज, पर्यटन, थर्मल पावर स्टेशन, बांबू इंडस्ट्रीज, सोलर, बँकिंग अशा विविध विषयांवर चर्चासत्र तसेच लगतच्या जिल्ह्यातील २०० उद्योजकांचे स्टॉल सदर उपक्रमामध्ये ठेवण्यात येणार आहे.

या कार्यक्रमात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होणे अपेक्षित आहे. चंद्रपूरमध्ये होणाऱ्या गुंतवणुकीकरीता सामंजस्य करार (एमओयु) करण्यात येणार असून या औद्योगिक एक्सपो करीता जिल्ह्यातील औद्योगिक संस्थांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले आहे.




**लोगो अनावरण**

पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते ॲडवांटेज चंद्रपूर इंडस्ट्रियल एक्सपो अँड बिजनेस कॉन्क्लेव्ह लोगोचे अनावरण करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, मनपा आयुक्त विपीन पालीवाल आदी उपस्थित होते.

सह्याद्रीचा राखणदार



# आनंदनिकेतन महाविद्यालयात वादविवाद स्पर्धा

**आनंदवन । प्रतिनिधी**

गेली अनेक वर्षे आनंद निकेतन महाविद्यालयात संपन्न होणारी स्व. इंदिरा बाई जनार्दनपंत देशपांडे स्मृती आंतर महाविद्यालयीन वाद-विवाद स्पर्धा याही वर्षी २३ फेब्रुवारी २०२४ ला महाविद्यालयात आयोजित करण्यात आली होती. चंद्रपूर जिल्ह्यातील जवळपास सात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला.भारतातील वाढते खाजगीकरण देशाच्या हिताचे ठरेल काय ?या विषयावर ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.



या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मृणाल काळे हे होते तर परीक्षक म्हणून छत्रपती राजे संभाजी प्रशासकीय सेवा महाविद्यालय मोरवा येथील प्राचार्य डॉ.दिलीप चौधरी, लोकमान्य महाविद्यालय वरोरा येथील अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. राविंद्र शेंडे, कृती अकॅडमी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र चंद्रपूर चे श्रीकांत साव यांनी काम पाहिले.या स्पर्धेचे समालोचन करतांना श्रीकांत साव यांनी विषयाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांशी संवाद साधला आणि वादविवाद स्पर्धेत उतरताना स्पर्धेकांनी कशी तयारी केली पाहिजे यावर मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ.दिलीप चौधरी यांनी याप्रसंगी स्पर्धकांनी वाचन,मुद्देसूद मांडणी,विषयाचा सखोल अभ्यास केला पाहिजे असे मत मांडले व या स्पर्धेचे, या स्पर्धेच्या विषयाचे आणि विद्यार्थ्यांनी उस्फूर्तपणे मांडलेल्या मतांचे कौतुक ही केले आणि परीक्षकांच्या वतीने आभार मानले. डॉ.रविंद्र शेंडे यांनीही याप्रसंगी या स्पर्धेला परीक्षक म्हणून येता आले याचा आनंद व्यक्त केला व आपली ही या विषया बाबतची मते व्यक्त केली.आपल्या अध्यक्षीय मनोगतातून प्राचार्य डॉ.मृणाल काळे यांनी आणि या स्पर्धेतील सर्वच स्पर्धकांचे कौतुक केले,आणि विद्यार्थ्यांनी अधिकाधिक अशा स्पर्धांमध्ये भाग घेतला पाहिजे असे मत व्यक्त केले.या स्पर्धेत प्रेम जरपोटवर( स्व.सुशिलाबाई रामचंद्रराव मामीडवार समाजकार्य महाविद्यालय चंद्रपूर) मयूर हनवते (आनंद निकेतन महाविद्यालय आनंदवन वरोरा) प्रलय मशाखेत्री,सरदार पटेल महाविद्यालय चंद्रपूर यांना अनुक्रमे प्रथम,व्दितीय व तृतीय पारितोषिक मिळाले तर उत्तेजनार्थ पारितोषिकश्रुती मोहितकर (सरदार पटेल महाविद्यालय चंद्रपूर )व सुरज चापले (स्व.सुशिलाबाई रामचंद्र मामीडवार समाजकार्य महाविद्यालय चंद्रपूर) यांना मिळाले.फिरता चषक यांना स्व.सुशिलाबाई रामचंद्र मामीडवार समाजकार्य महाविद्यालय चंद्रपूर) यांना मिळाला.या स्पर्धेचे प्रास्ताविक या स्पर्धेचे संयोजक असणारे प्रा.अरविंद बरडे यांनी केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.तिलक ढोबळे व स्पर्धेच्या नियमांचे वाचन प्रा. मोक्षदा नाईक यांनी केले.आभार प्रदर्शन प्रा.कल्याणी आत्राम यांनी केले. स्पर्धेच्या वेळेच्या नियोजनाची जबाबदारी प्रा.सागर मांडवकर यांनी सांभाळली. प्राचार्य डॉ.मृणाल काळे यांच्या मार्गदर्शनात व प्रा.डॉ.नरेंद्र पाटील, प्रा.डॉ.प्रशांत वाघ, प्रा.डॉ.संयोगीता वर्मा,प्रा.सुनीता वारे यांच्या सहकार्याने ही स्पर्धा यशस्वीरित्या संपन्न झाली.

# स्कॉलर सर्च अकॅडेमी ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थिनींची इंडस्ट्रियल विजिट

**कोरपना । प्रतिनिधी**

स्कॉलर सर्च अकॅडेमी ज्युनिअर कॉलेज, कोरपना येथील विद्यार्थिनींनी नुकतीच एम्ब्रोईडरी अँड स्टिचिंग क्लस्टर, चंद्रपूर येथे इंडस्ट्रियल विजिटला भेट दिली. या भेटीमध्ये विद्यार्थिनींनी एम्ब्रॉयडरी आणि स्टिचिंग उद्योगाची उत्पादन प्रक्रिया जवळून पाहिली.



विद्यार्थिनींना विविध औद्योगिक मशीन्स, त्यासाठी लागणारे साहित्य, कच्चामाल आणि पक्का माल याबद्दल सखोल माहिती देण्यात आली. तसेच उद्योग उभारण्यासाठी लागणारी साधनसामग्री आणि आर्थिक नियोजन याबद्दलही मार्गदर्शन करण्यात आले. हे सर्व मार्गदर्शन एम्ब्रोईडरी अँड स्टिचिंग क्लस्टरमधील कर्मचारी मीनाक्षी काकडे, स्नेहल काटकर आणि संगीता येरकडे यांनी केले.क्लस्टरचे चेअरमन श्री. इंजिनियर दिलीप झाडे यांनी विद्यार्थिनींना यशस्वी उद्योजक बनण्यासाठी प्रेरणा दिली. त्यांनी प्रॅक्टिकल लाईफ आणि विद्यार्थ्यांचे भविष्य उज्वल बनविण्यासाठी अशा इंडस्ट्रियल विजिटचे महत्त्व अधोरेखित केले. अशा भेटीमुळे विद्यार्थ्यांच्या कामाबद्दलचा आत्मविश्वास वाढतो असेही ते म्हणाले.या औद्योगिक भेटीसाठी शाळेच्या सहाय्यक शिक्षिका ज्योत्स्ना दहागावकर, दीपाली लिंगजवार, विशाल मालेकर आणि गिरधर कोटे यांनी मार्गदर्शन केले. या भेटीचे आयोजन शाळेचे संस्थापक श्री. इंजिनियर दिलीप झाडे आणि प्राचार्य राहुल उलमाले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.

# स्कॉलर सर्चअकॅडमी ज्यूनिअर कॉलेज इथे करियर गायडन्स मेळावा

**कोरपना । प्रतिनिधी**

सर्च फाउंडेशन संचालित, स्कॉलर सर्च अकॅडमी ज्युनिअर कॉलेज, कोरपना येथे दहावी, अकरावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी करिअर गायडन्स मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात नागपूरचे श्री रोशन पांडे यांनी मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहून विद्यार्थ्यांना करिअर निवडीबाबत मार्गदर्शन केले.



श्री पांडे यांनी नीट, आयआयटी-जेईई , एमएचसीईटी आणि सीयूईटी या परीक्षांची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना दिली. या परीक्षांचा अभ्यासक्रम, परीक्षा कधी असते आणि या परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर कुठल्या अभ्यासक्रमाला प्रवेश मिळू शकतो याविषयी त्यांनी विस्तारपूर्वक माहिती दिली.याप्रसंगी महात्मा गांधी विद्यालयाचे संचालक हरिश्चंद्र थिपे, शाळेचे प्राचार्य राहुल उलमाले, उपप्राचार्य ज्योत्स्ना दहागावकर तसेच शाळेतील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. शाळेचे संस्थापक इंजीनियर दिलीप झाडे आणि कुंदा झाडे यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या समोरील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. हा करिअर गायडन्स कार्यक्रम अतिशय उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमातून मोठ्या प्रमाणात माहिती मिळवून आपल्या करिअर निवडीबाबत योग्य निर्णय घेण्यासाठी मदत मिळवली. एखाद्याने विशिष्ट विषयाचे शिक्षण घेतल्यास त्याच क्षेत्रात तो कशी प्रगती करतो हा प्रवास म्हणजे एखाद्याचे करिअर. किंवा एखाद्याने विशिष्ट क्षेत्रात व्यवसाय सुरू केल्यास त्याला मिळणारा यश म्हणजे त्याचे करिअर असे मानतो. आजकालच्या तरुण पिढीला त्यांच्या भविष्यात चांगले करिअर घडवण्यासाठी मार्गदर्शन करणे अत्यंत आवश्यक आहे. हेच करिअर मार्गदर्शन देण्याकरिता नागपूरचे रोशन पांडे हे मार्गदर्शक म्हणून आले होते.

# सोनेगाव येथे भाषा विषयाची प्रदर्शनी






**भद्रावती । प्रतिनिधी**

तालुक्यातील आष्टा केंद्रातील प्राथमिक शाळा सोनेगाव येथे भाषा विषयाची प्रदर्शनी १६ फेब्रुवारीला घेण्यात आली होती. या प्रदर्शनाद्वारे विद्यार्थ्यांसह पालकांना भाषेची गोडी लागावी यासाठी विविध उपक्रम राबवण्यात आले. सीखे फाउंडेशन मुंबई जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था आणि जिल्हा परिषद शिक्षण विभाग चंद्रपूर यांच्या साहित्य विद्यमाने टीचर प्रोग्राम सुरू आहे. यापूर्वी ऑगस्ट २०२३, जानेवारी २०२४ मध्ये दोन दिवसीय प्रशिक्षण घेण्यात आले. त्यानंतर प्रत्येक शाळेत दिलेल्या प्रशिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसोबत उपक्रम राबविण्यात आले. कार्यक्रमाची फलश्रुती म्हणून शाळास्तरावर सीखे इंडिया उत्सव साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात गावात प्रभात फेरी काढून उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व फीत कापून करण्यात आली. या शाळेमध्ये आयोजित प्रदर्शनीला शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष भास्कर ननावरे, प्रमुख पाहुणे शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष उज्वला शेंडे, अरविंद, विजय, पत्राबाई जांभुळे, मोतीराम शेंडे, राजेशवर शेंडे, दिलीप सावसाकडे, ताराबाई यांची उपस्थिती होती. मोठ्या संख्येने ग्रामस्थांनी प्रदर्शनी बघण्यासाठी हजेरी लावली. विद्यार्थ्यांनी मुखपृष्ठ व मलपृष्ठ तयार करून सुंदर अशा गोष्टीचे पुस्तक तयार केले. शिवाय वर्गातील उपस्थित बारा विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या गोष्टी सांगितल्या. शिवाय वासाची किंमत या पाठावर आधारित सुंदरशी नाटिका सादर केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेची धुरा या शाळेचे मुख्याध्यापक मनोजकुमार झोडे यांनी पार पडली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सीखे मार्गदर्शिका कल्याणी भोस्कर यांनी केले.

# यशवंतराव शिंदे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात अंतराळ यात्रेचे आयोजन

**भद्रावती । प्रतिनिधी**

भद्रावती शिक्षण संस्था भद्रावती द्वारा संचालित यशवंतराव शिंदे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय चिचोर्डी , भद्रावती येथे अंतराळ संशोधन संस्था आणि विज्ञान भारती यांच्या संयुक्त विद्यमाने अंतराळ यात्रा या कार्यक्रमाचे आयोजन दिनांक २६ फेब्रुवारी २०२४ ला आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटक प्रा डॉ कार्तिक शिंदे , सचिव भद्रावती शिक्षण संस्था भद्रावती, डॉ प्रकाश महाकाळकर गट शिक्षणाधिकारी , पंचायत समिती भद्रावती, प्राचार्य डॉ जयंत वानखेडे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.




स्पेस ऑन व्हिल्स ही प्रदर्शनी विदर्भातील बारा जिल्ह्यात येत आहे. भद्रावती तालुक्यातील यशवंतराव शिंदे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय चिचोर्डी येथे ह्या प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले आहे . या प्रदर्शनीला भेट देण्यासाठी २१ शाळांची नोंदणी झाली असून, २७०० विद्यार्थ्यांनी नोंदणी पूर्ण केलेली आहे. इस्त्रो बस मधील अंतराळ उपक्रम व मॉडेल्स पाहण्याची संधी भद्रावती तालुक्यातील विद्यार्थ्यांना प्राप्त होणार आहे. तेव्हा या प्रदर्शनीला तालुक्यातील सगळ्याच शाळांनी व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येत उपस्थित राहून या प्रदर्शनीचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्राचार्य डॉ जयंत वानखेडे , पर्यवेक्षक महादेव ताजने, प्रा. डॉ ज्ञानेश हटवार, उमेश पाटील, रवींद्र बनकर, रमेश चव्हाण व आयोजक मंडळींनी केले आहे.

# प्रगतीचा आलेख मुलांच्या सादरीकरणातून दिसतो-मुख्याध्यापक पुंडलिक घुगल

**भद्रावती । प्रतिनिधी**

विद्यार्थी वर्षभर जे काही शिकले, ज्या पद्धतींचा त्यांनी वर्षभर अभ्यास केला आणि कार्यपुस्तिकांवर सराव केला त्यांचा यशस्वी आलेख त्यांनी तयार केलेल्या भाषा आणि गणित विषयांच्या मॉडेल मधून तसेच सादरीकरणातून दिसून येतो असे मत जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा गवराळाचे मुख्याध्यापक पुंडलिक घुगल यांनी व्यक्त केले.




टीचर इनोव्हेटर कार्यक्रमातून शिक्षकांना ज्या पद्धतींचे प्रशिक्षण दिले जाते ते तसेच मुलांचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी मुले बोलकी करण्यासाठी आणि त्यांची गुणवत्ता वाढीसाठी नक्कीच होतो असेही ते म्हणाले. भद्रावती तालुक्यातील जि.प. उच्च प्राथ शाळा गवराळा या शाळेतील विद्यार्थ्यांनी सीखे इंडिया उत्सवात विद्यार्थ्यांनी वेगवेगळी भाषा आणि गणित विषयांचे नाविन्यपूर्ण मॉडेल तयार करून पालक आणि ग्रामस्थांसमोर अतिशय उत्स्फूर्तपणे सादरीकरण केले तसेच विचारलेल्या प्रश्नांची समर्पक उत्तरे देऊन सर्वांची मने जिंकली. मागील वर्षभर सिखे संस्था मुंबई च्या वतीने शिकवण्यात आलेल्या टीआयपी कार्यक्रमाच्या पद्धती विद्यार्थ्यांनी आत्मसात केल्या आणि आपल्या कार्यपुस्तिकेत त्यांचा सराव केला. या पद्धतींचे जेव्हा प्रदर्शन भरवण्यात आले त्यावेळी ज्या पद्धती विद्यार्थी वर्गात शिकले त्यांचे उत्तमरीत्या विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले. या प्रदर्शनात विद्यार्थ्यानी गणित व भाषा विषयाचे मॉडेल्स तयार केले. यात अपूर्णांकावर आधारित अपूर्णांकाची ओळख, संख्यारेषा, भाजीपाल्याचे शेत, वर्गातील ग्रंथालय, खेळाचे कपाट, माझा मनोरा, क्रिकेटचे मैदान, तर भाषेत विद्यार्थ्यांचे स्वतः तयार केलेल्या गोष्टींची पुस्तके, गोष्ट तक्ता, गोष्टीचा डोंगर, गोष्टींचे घटक काय असतात याचे सादरीकरण केले. तत्पूर्वी विद्यार्थ्यांनी प्रभातफेरी काढून सर्वांना प्रदर्शन बघण्याकरिता आमंत्रित केले. या प्रसंगी विद्यार्थ्यांचे पालक, महिला मंडळ व शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. या प्रदर्शनात शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांनी सहभाग घेतला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक पुंडलिक घुगुल, सहशिक्षक उर्मिला बोंडे, प्रतिभा धकाते, प्रिया मसराम, शुभेच्छा साठे यांनी विशेष परिश्रम घेतले. शाळा व्यवस्थापन समितीचे सतीश माहुरे, माता पालक आणि गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम सीखे कोच पल्लवी वाळके यांच्या मार्गदर्शनखाली पार पडला.

## मातेच्या आशीर्वादाने पुन्हा मंत्री होण्याची संधी मिळाली

# तर मातेचा परिसर अतिशय देखणा करु-विजय वडेट्टीवार

**मुल । प्रतिनिधी**

जिल्हा खनिज विकास निधी व खासदार स्थानिक विकास निधी मधून बांधकाम करण्यात आलेल्या मा दुर्गा मंदिर सामाजिक सभागृहाचा लोकार्पण करतांना विधान सभेचे विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी अभिवचन दिले.




लोकार्पण सोहळ्याचे अध्यक्ष मंदिर समितीचे अध्यक्ष व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष संतोषसिंह रावत,प्रमुख अतिथी गडचिरोली माजी आमदार डॉ.नामदेवराव उसेंडी,काँग्रेसचे गडचिरोली जिल्हाध्यक्ष महेंद्र ब्राम्हणवाडे,डाँ. नामदेव किरसान,ज्येष्ठ कार्यकर्ते हसन जिलानी, प्राचार्य देविदास जगनाडे,कृषी उत्पन्न बाजार सभापती राकेश रत्नावार, सिदेंवाहीचे नगराध्यक्ष स्वप्नील कावळे,माजी सभापती व संचालक घनश्याम येनुरकर, माजी नगरसेवक नंदुजी नागरकर, माजी नगराध्यक्ष विजय चिमड्यालवार,सा.बां. उपविभागाचे उपविभागीय अभियंता प्रशांत वसुले,माजी महापौर वसंता देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते.जिल्ह्याचे पालकमंत्री झाल्यानंतर मंदिरात सामाजिक सभागृह उभारण्यासाठी निधी उपलब्ध करून द्यावे.अशी विनंती ना.विजय वडेट्टीवार यांना केली असता तात्काळ निधी उपलब्ध करुन दिल्यानेच हे सभागृह साकारल्याचे मत मंदिर समितीचे अध्यक्ष संतोषसिंह रावत यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सभापती राकेश रत्नावार यांनी मंदिर बांधत असताना अनेक अडचणी आल्या परंतु मातेच्या आशीर्वादाने व विजयभाऊच्या सहकार्याने अडचणी दूर झाल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे संचालन मंदिर समितीचे सचिव संजय पडोळे यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रदर्शन मंदिर समितीचे सदस्य गुरु गुरनुले यांनी मानले.कार्यक्रमानंतर विजय वडेट्टीवार यांचे हस्ते मुल तालुका कांग्रेस, महिला काँग्रेसच्या वतीने नियुक्त केलेल्या सर्व सेलच्या अध्यक्ष,उपाध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष, सहसचिव यांना नियुक्ती पत्र देवुन सन्मानित करण्यात आले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .